☎ (02462) 29241, 29242-43, 29250-52 फॅक्स : (02462) 29245

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड-431 606

---

जा.क्र. शैक्षणिक/संलग्न/2000-2001/ 1866-74 दिनांक :- 27.07.2000

प्रति,
मा. अध्यक्ष / सचिव,
श्री शारदा भवन शिक्षण संस्था,
द्वारा - विधी महाविद्यालय,
नांदेड - 431 602

इंदिरा गांधी महाविद्यालय
सिडको, नांदेड.
आवक क्र. 01
दिनांक व सही 04.8.2000

विषय :- शैक्षणिक वर्ष 2000-2001 पासून आपल्या संस्थेच्या सिडको, नवीन नांदेड येथील इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालयाच्या कला शाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या संलग्नीकरणा बाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. एनजीसी 2000/नमवि/(1/2000)/मशि-3, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - 400 032, दिनांक 28 जून, 2000

महोदय,

महाराष्ट्र शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये परवानगी दिलेल्या आपल्या संस्थेच्या सिडको, नवीन नांदेड येथील इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालयाच्या संलग्नीकरणा बाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, 1994 कलम 83 (2) नूसार गठित करण्यात आलेल्या प्राचार्य आर.एल. कावळे यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन सादर केलेला अहवाल विद्या परिषदेच्या वतीने स्वीकारुन कला विद्याशाखेतील बी.ए. प्रथम वर्षासाठी खालील दर्शविलेल्या विषयांना पुढील अटींच्या अधिन राहून 2000-2001 या एका शैक्षणिक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात संलग्नीकरण प्रदान करण्यास मा.कुलगुरुंनी मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| **बी.ए. प्रथम वर्ष :-** अनिवार्य भाषा | : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा | : | मराठी, हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र व अर्थशास्त्र. |

अटी :-

1. रीतसर प्राचार्याची नेमणूक करावी.
2. बी.ए. प्रथम वर्षासाठी आवश्यक असणारे प्रत्येक विषयासाठी किमान 50 टक्के क्रमिक पुस्तकाच्या प्रती ग्रंथालयासाठी खरेदी कराव्यात.
3. संबंधित विषयासाठी विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या समिती मार्फत अधिव्याख्यात्यांच्या नेमणूका कराव्यात
4. आवश्यक ते शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करावेत.
5. भूगोल या विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा व आवश्यक ती उपकरणे 31 ऑगष्ट पूर्वी खरेदी करावेत.
6. बी.ए. प्रथम वर्षाच्या पहिल्या तुकडीत जास्तीत जास्त 120 विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल.

वरील अटी पूर्ण करण्यासंबंधिचे लेखी हमी पत्र संस्था अध्यक्ष / सचिव यांनी विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे.

....2

PRINCIPAL
Indira Gandhi (Sr.) College
CIDCO, New Nanded

महाविद्यालयास परवानगी देते वेळी शासनाने दिनांक 28 जून, 2000 च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी तसेच या पत्रात नमूद केलेल्या विद्यापीठाच्या अटी आणि विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमाचे पालन करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील.

आपला विश्वासू,

sd/-

**संचालक**

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत :-

1. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032.
2. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 411 001
3. मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, तारासिंह मार्केट, नांदेड - 431 601
4. प्रभारी प्राचार्य, इंदिरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड
5. मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ यांना विद्या परिषदेची कार्योत्तर मान्यता घेण्यास्तव.
6. परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ
7. उप-कुलसचिव, विशेष कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
8. पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

**संचालक,**

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

PRINCIPAL
Indira Gandhi (Sr.) Colleg
CIDCO, New Nanded